दैनिक
# व्याघ्र शौर्यम

उशीरा दिलेला न्याय हा अन्यायासारखाच असतो.

epaper.vyaghrashuryam.com vyaghrashuryam.com vyaghrashuryam@gmail.com

▪ जळगाव ▪ वर्ष - 1 ▪ अंक - ८७ ▪ सोमवार, दि.०२ मार्च २०२६ Reg. No.MHMAR/25/A2382 ▪ पाने - 8 ▪ किंमत रु.2

# अमेरिका, इस्त्रायलच्या हल्ल्यात खामेनींचा मृत्यू!

## इराणमध्ये ४० दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा : बैठक सुरु असताना स्ट्राइक

**इराण ।** अमेरिका आणि इस्त्रायलचे इराणवरील हल्ले अद्याप सुरू असून, इराणही प्रत्येक हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर देत आहे. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहू यांनी दावा केला आहे की, इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. इराणी माध्यमांनीदेखील खामेनी यांच्या मृत्यूची पुष्टी केल्याचे वृत्त आहे.

प्राप्त माहितीनुसार खामेनी हे सुरक्षा परिषदेचे सल्लागार अली शमखानी आणि इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सचे प्रमुख मोहम्मद पाकपूर यांच्यासोबत बैठक घेत असताना इस्त्रायलने त्या ठिकाणी स्ट्राइक केला. हा हल्ला काल करण्यात आल्याचे सांगितले जाते. रिपोर्ट्सनुसार, इस्त्रायल आणि अमेरिका अली शमखानी यांचा सातत्याने मागोवा घेत होते. शनिवारी ते खामेनी यांना भेटण्यासाठी गेले असताना, दोन्ही देशांनी संयुक्तरीत्या खामेनी यांच्यावर हल्ला केल्याचा दावा करण्यात आला आहे. या हल्ल्यात ८६ वर्षीय इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत दावा केला की, ८६ वर्षीय आयतुल्लाह अली खामेनी यांचा एका लष्करी मोहिमेदरम्यान मृत्यू झाला आहे. ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये खामेनी यांना इतिहासातील सर्वात वाईट व्यक्तींमधील एक असे संबोधले आणि त्यांच्या



मृत्यूला न्याय मिळाल्याचे म्हटले. यासोबतच ट्रम्प यांनी असेही नमूद केले की, मध्यपूर्वेत आणि जगात शांतता प्रस्थापित होईपर्यंत किंवा संपूर्ण आठवडा अखंडपणे बॉम्बहल्ले सुरू राहतील. ट्रम्प यांच्या या वक्तव्यानंतर आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये बातम्या वेगाने पसरल्या असून परिस्थितीबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

### इराणमध्ये ४० दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा

दरम्यान, खामेनी यांच्या सोबत कुटुंबातील आणखी चार सदस्यांचाही मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. इराणी माध्यमांनीही या बातमीची पुष्टी केल्याचे सांगितले जाते. प्रेस टीव्हीने खामेनी आता हयात नसल्याचे वृत्त दिले आहे. त्यांच्या निधनानंतर ४० दिवसांच्या राष्ट्रीय शोकाची घोषणाही करण्यात आली आहे. मध्यपूर्वेत तणावाची परिस्थिती कायम आहे.

# एलपीजी सिलिंडर महागले!

**मुंबई ।** देशातील सर्व तेल विपणन कंपन्यांनी एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढवल्या आहेत. गॅस सिलिंडरच्या किमती २८ रुपयांनी वाढवून ३१ रुपये करण्यात आल्या आहेत, नवीन किमती देखील आजपासून म्हणजेच १ मार्चपासून लागू झाल्या आहेत. तथापि, ही वाढ फक्त १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरवर झाली आहे. घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १४.२ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. दिल्लीत १९ किलोच्या एलपीजी सिलिंडरची किंमत १७४०.५० रुपयांवरून १७६८.५० रुपये झाली आहे.

कोलकातामध्ये १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत आजपासून १८७५.५० रुपये झाली आहे, जी पूर्वी १८४४.५० रुपये होती. मुंबईत त्याची



किंमत १६९२.०० रुपयांवरून १७२०.५० रुपये आणि चेन्नईमध्ये १८९९.५० रुपयांवरून १९२९.०० रुपये झाली आहे. तेल विपणन कंपन्यांचा हा निर्णय देशातील सर्व रेस्टॉरंट, हॉटेल आणि ढाबा चालकांसाठी मोठा धक्का आहे. होळीच्या सणाला आता फक्त २ दिवस उरले आहेत, अशा परिस्थितीत गॅसच्या किमती वाढल्याने रेस्टॉरंट, हॉटेल आणि ढाबा चालकांचा खर्च वाढेल. मात्र, सामान्य लोकांना जुन्या किमतीतच गॅस मिळेल. घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरची किंमत दिल्लीत ८५३.०० रुपये, कोलकातामध्ये ८७९.०० रुपये, मुंबईत ८५२.५० रुपये आणि चेन्नईमध्ये ८६८.५० रुपये आहे. याशिवाय, पीएनजी म्हणजेच पाईपद्वारे थेट स्वयंपाकघरात पोहोचणाऱ्या गॅसच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. दिल्लीत पीएनजीची सध्याची किरकोळ किंमत प्रति एससीएम ४८.५९ रुपये, नोएडामध्ये प्रति एससीएम ४८.४६ रुपये, गुरुग्राममध्ये प्रति एससीएम ४७.४० रुपये, कानपूरमध्ये प्रति एससीएम ४९.९५ रुपये आणि अजमेरमध्ये प्रति एससीएम ५०.२७ रुपये आहे.

# थंडी संपताच जाणवू लागलाय उन्हाचा तडाखा

**जळगाव ।** थंडी सरत आली आहे. आणि हवामानात बदल जाणवायला लागला आहे. मार्च मधल्या आल्हाददायक वातावरणात उकाडा जाणवायला लागला असून हळू हळू गरमीच्या ऋतूला सुरुवात होते आहे. हवामान काही दिवस उष्ण आणि दमट राहणार असून तापमानाचा पारा ३२ अंशाच्या पार जाणार आहे, बदलत वातावरण, कोरड हवामान शिवाय हवेची खराब गुणवत्ता यामुळे आरोग्याची काळी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान कोरडे आणि उष्ण राहणार असून पारा हा ३३ अंशांपर्यत पोहोचणार आहे. सकाळी काहीसा गारवा तर दुपारी कडक ऊन पुणेकरांना



येत्या काही दिवसात असे विचीत्र हवामान अनुभवायला मिळणार आहे. उत्तर महाराष्ट्रात हवामान काही ठिकाणी हिटवेव्हचा अलर्ट देण्यात असून दिवसभर कडक ऊन आणि रात्री थंड वातावरण राहील आणि पारा ३४ अंशांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मराठवाडा आणि विदर्भ तापमानाचा पारा हा ३६ अंधांवर जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# नगरसेवकांचा फोन अन् अतिक्रमण विभाग ऑन ड्युटी!

## कारवाईनंतर रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

**जळगाव ।** शहरातील शनिपेठ परिसरात भाजीपाला विक्रेत्यांच्या अतिक्रमणामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाची अखेर दखल घेण्यात आली. नागरिकांनी सोशल मीडियावर आवाज उठवल्यानंतर स्थानिक नगरसेवक नितीन लड्ढा यांनी तत्काळ पुढाकार घेत मनपा प्रशासनाशी थेट संपर्क साधला. तक्रारीची दखल घेत शनिवारीच अतिक्रमण विभागाने कारवाई करत शनिपेठेतील दोन्ही



गल्ल्यांमधील अतिक्रमण हटवले.

शहरातील शनिपेठ परिसरात बळीराम मंदिर आणि शनिमंदिर समोरील गल्लीत दररोज भाजीपाला विक्रेते रस्त्यावर लोटगाडी लावून किंवा रस्त्यावर बसून भाजीपाला विक्री करतात. भाजीपाला विक्रेत्यांमुळे जवळपास ७० टक्के रस्ता ब्लॉक होतो आणि वाहनचालकांना ये-जा करण्यास रस्ता राहत नाही. शनिवारी तर कहरच असतो, काही मुजोर विक्रेते अरेरावी देखील करतात. याबाबत आज नागरिकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आवाज उठवला होता. तक्रारीची दखल घेत नगरसेवक नितीन लड्ढा यांनी मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्यासह अतिक्रमण विभागाचे अधीक्षक संजय ठाकूर यांच्याशी संपर्क साधून स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. नवीन तयार केलेले रस्ते जर नागरिकांना वापरण्यास मिळत नसतील, तर अशा रस्त्यांचा उपयोग काय? असा थेट सवाल त्यांनी केला. तसेच अतिक्रमणमुळे नागरिकांना त्रास होता कामा नये असेही त्यांनी सांगितले.

### नागरिकांच्या तक्रारी

अनेक दिवसांपासून अतिक्रमणामुळे त्रस्त असलेल्या नागरिकांनी गल्ल्या मोकळ्या झाल्याने समाधान व्यक्त केले. रस्त्यांनी मोकळा श्वास घेतल्याची भावना व्यक्त करत नागरिकांनी नगरसेवक नितीन लड्ढा यांच्यासह अतिक्रमण विभागाचे आभार मानले. नागरिकांच्या तक्रारी, सोशल मीडियावरील आवाज आणि लोकप्रतिनिधींच्या तत्परतेमुळे प्रशासन हालचालीत येऊ शकते, हे या घटनेतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

## संपादकीय

# पेपर फुटी अन् कॉपीमुक्तचा बाजार!

जळगाव जिल्ह्यात दहावी, बारावीच्या परिक्षेदरम्यान मोठ्या प्रमाणावर पेपर फुटी आणि कॉपीचा बाजार मांडल्याने शैक्षणिक क्षेत्रात काय सुरु आहे हे उघड्या डोळ्यांनी बघितले आहे. शैक्षणिक क्षेत्रासाठी हे प्रकरण काळीमा फासणारे असून कडक उपाययोजनेंमध्ये देखील असे प्रकार होत असतील तर त्यात काही तरी गोडबंगाल असल्याचे नक्की आहे.

जळगाव जिल्ह्यात दहावी व बारावीच्या परीक्षेदरम्यान उघड झालेल्या पेपरफुटी आणि कॉपीच्या बाजाराने संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या वर्षभराच्या परिश्रमाचे मूल्यमापन; परंतु जर प्रश्नपत्रिका आधीच बाहेर येत असतील आणि कॉपीचे जाळे उघडपणे कार्यरत असेल, तर ही केवळ गैरव्यवहाराची बाब राहत नाही, तर ती व्यवस्थेच्या अपयशाची साक्ष ठरते. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात असा काळाबाजार माजणे ही समाजासाठी धोक्याची घंटा आहे. दरवर्षी परीक्षा काळात कडक बंदोबस्त, भरारी पथके, सीसीटीव्ही, गोपनीय छपाई केंद्रे, सीलबंद पाकिटे अशा उपाययोजना जाहीर केल्या जातात. तरीही पेपर फुटणे किंवा मोठ्या प्रमाणावर कॉपी होणे थांबत नसेल, तर केवळ विद्यार्थ्यांना दोष देऊन भागणार नाही. यात कुठेतरी साखळीबद्ध संगनमत, आर्थिक व्यवहार आणि राजकीय–प्रशासकीय छत्रछाया असण्याची शक्यता नाकारता येत नाही. गोडबंगाल हा शब्द केवळ शंका नसून, तो व्यवस्थेतील पोकळीचा सूचक आहे.

विद्यार्थ्यांवर याचा सर्वाधिक विपरीत परिणाम होतो. प्रामाणिकपणे अभ्यास करणारा विद्यार्थी आणि पैसे देऊन पेपर मिळवणारा किंवा कॉपी करणारा विद्यार्थी यांच्यातील स्पर्धा अन्यायकारक ठरते. मेहनतीचे महत्त्व कमी होते, प्रामाणिकतेवरचा विश्वास डळमळीत होतो आणि ङ्गमार्ग काढणेफ हीच यशाची गुरुकिल्ली आहे, असा चुकीचा संदेश तरुण पिढीपर्यंत पोहोचतो. हीच मानसिकता पुढे जाऊन नोकरी, व्यवसाय आणि सार्वजनिक जीवनातही भ्रष्ट आचरणाला खतपाणी घालते. शिक्षण हे केवळ गुणपत्रिकेपुरते मर्यादित नसते; ते मूल्यांची जडणघडण करते. परंतु जेव्हा परीक्षाच संशयास्पद ठरतात, तेव्हा संपूर्ण शिक्षणप्रणालीची विश्वासार्हता कमी होते. पालकांचा शाळांवरील आणि मंडळांवरील विश्वास कमी होतो. ग्रामीण व शहरी भागातील गुणवत्तेतील दरी वाढते. आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबे ङ्गव्यवस्थाफ वापरून मुलांना पुढे नेतात, तर सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणाची किंमत मोजावी लागते. यामागील कारणे अनेक स्तरांवर शोधावी लागतील. परीक्षा–केंद्रित शिक्षणपद्धती, गुणांच्या स्पर्धेचा अतिरेक, प्रवेश प्रक्रियेत उच्च टक्केवारीची अनिवार्यता, कोचिंग संस्कृतीचा वाढता प्रभाव आणि अपयशाची भीतीया सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे शॉर्टकटचा मोह. काही ठिकाणी स्थानिक पातळीवर प्रश्नपत्रिकेची गुप्तता भंग होणे, कर्मचाऱ्यांची निष्काळजीपणा किंवा संगनमत, तांत्रिक सुरक्षेतील त्रुटी हे घटकही कारणीभूत ठरू शकतात. मात्र उपाय केवळ कडक कारवाईपुरते मर्यादित नसावेत. दोषींवर कठोर शिक्षेची अंमलबजावणी आवश्यक आहेच; परंतु त्याबरोबर पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित व्यवस्था उभी करणे तितकेच महत्त्वाचे आहे. प्रश्नपत्रिकेची डिजिटल एन्क्रिप्शन प्रणाली, शेवटच्या क्षणी सुरक्षित डाउनलोड, बहुस्तरीय देखरेख, केंद्रनिहाय जबाबदारी निश्चिती आणि तक्रार नोंदविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. चौकशी अहवाल सार्वजनिक करून जबाबदारी ठरवली गेली, तरच लोकांचा विश्वास परत मिळेल.

याशिवाय शिक्षणाच्या मूल्याधिष्ठित बाजूला बळकटी देणे गरजेचे आहे. शाळांमध्ये प्रामाणिकतेचे शिक्षण, नैतिकतेवरील चर्चा, अपयश स्वीकारण्याची तयारी आणि कौशल्याधारित मूल्यांकनाची वाढ यावर भर द्यायला हवा. परीक्षेतील एक–दोन गुणांच्या फरकावर भवितव्य ठरत नाही, हा संदेश समाजाने आणि पालकांनी मुलांना दिला पाहिजे. गुणांपेक्षा ज्ञान, कौशल्य आणि चारित्र्याला महत्त्व दिले, तर पेपरफुटीचा बाजार आपोआपच आटोक्यात येईल. जळगावमधील घटना ही केवळ एका जिल्ह्यापुरती मर्यादित नाही; ती संपूर्ण राज्य आणि देशासाठी इशारा आहे. आज जर या प्रकारांकडे दुर्लक्ष झाले, तर उद्या डॉक्टर, अभियंते, प्रशासकीय अधिकारी यांची गुणवत्ता प्रश्नांकित होईल. शिक्षणातील भ्रष्टाचार म्हणजे भविष्यातील पिढीशी केलेली फसवणूक होय. त्यामुळे शासन, शिक्षण मंडळे, शिक्षक, पालक आणि विद्यार्थीसर्वांनी मिळून या समस्येला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. परीक्षा ही भीतीची नव्हे, तर आत्मविश्वासाची कसोटी असावी. पेपरफुटी आणि कॉपीच्या सावटाखाली ती होऊ शकत नाही. व्यवस्थेतील ङ्गगोडबंगालफ उघडकीस आणून, पारदर्शकता आणि जबाबदारीची नवी पायाभरणी करणे हीच काळाची गरज आहे. अन्यथा शिक्षणाचा पाया पोखरणाऱ्या या वाळवीकडे पाहत राहण्याशिवाय आपल्या हातात काहीच उरणार नाही.

# होळी : बंधुभावाचा उत्सव!

**होळी हा भारतीय संस्कृतीतील सर्वात रंगीबेरंगी, उत्साहपूर्ण आणि आनंददायी सण मानला जातो. हिवाळ्याचा निरोप देत वसंत ऋतूच्या आगमनाचे स्वागत करणारा हा सण केवळ रंगांचा उत्सव नसून सामाजिक ऐक्य, प्रेम, बंधुभाव आणि आनंद यांचा उत्सव आहे. भारताच्या विविध भागांत हा सण वेगवेगळ्या परंपरा आणि रूढींनुसार साजरा केला जातो, तरीही त्यामागील भावना एकच असतेमनातील कटुता दूर करून नव्या उत्साहाने जीवनाची सुरुवात करणे.**



होळीचा सण प्रामुख्याने फाल्गुन महिन्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो. या सणामागे पौराणिक कथा सांगितली जाते. हिरण्यकश्यपू नावाचा राक्षसराजा स्वतःला देव समजू लागला होता. त्याचा मुलगा प्रल्हाद हा मात्र भगवान विष्णूचा परम भक्त होता. हिरण्यकश्यपूने प्रल्हादाला अनेक वेळा ठार मारण्याचा प्रयत्न केला, पण प्रत्येक वेळी विष्णूने त्याचे रक्षण केले. शेवटी त्याने आपली बहीण होलिका हिची मदत घेतली. होलिकेला अग्नीत न जळण्याचे वरदान होते. ती प्रल्हादाला मांडीवर घेऊन अग्नीत बसली; परंतु देवाच्या कृपेने प्रल्हाद वाचला आणि होलिका जळून भस्मसात झाली. या घटनेच्या स्मरणार्थ होलिका दहन केले जाते. यामध्ये वाईटावर चांगल्याचा विजय आणि अहंकाराचा नाश याचा संदेश दिला जातो. होळीच्या आदल्या दिवशी होलिका दहन केले जाते. गावोगावी किंवा वस्तीमध्ये लाकूड, वाळकी झाडे आणि काडीकचरा एकत्र करून मोठी होळी पेटवली जाते. लोक त्या अग्नीभोवती प्रदक्षिणा घालतात, नारळ अर्पण करतात आणि आपल्या आयुष्यातील नकारात्मक गोष्टी जळून जाव्यात अशी प्रार्थना करतात. काही ठिकाणी नवीन पीकही अग्नीमध्ये अर्पण करून निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते. होलिका दहन हा केवळ धार्मिक विधी नसून सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे. दुसऱ्या दिवशी रंगपंचमी किंवा धुळवड साजरी केली जाते. या दिवशी लोक एकमेकांवर रंग उधळतात, पिचकारीने रंगीत पाणी मारतात आणि ङ्गहोळी है!फ असे म्हणत आनंद साजरा करतात. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण या उत्सवात सहभागी होतात. या दिवशी जात, धर्म, वय, पद यांचे बंधन राहत नाही. सगळे भेद विसरून लोक एकमेकांना रंग लावतात आणि प्रेमाने आलिंगन देतात. त्यामुळे समाजात बंधुभाव आणि सौहार्द वाढते. होळीच्या दिवशी विविध पारंपरिक पदार्थ बनवले जातात. महाराष्ट्रात पुरणपोळी, करंजी, शेव, चकली यांसारखे गोडधोड पदार्थ केले जातात. उत्तर भारतात गुजिया, ठंडाई यांचा विशेष आनंद घेतला जातो. कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र येऊन जेवण करतात, गाणी म्हणतात आणि नृत्य करतात. त्यामुळे कुटुंबातील नाती अधिक दृढ होतात.

होळी हा सण केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक नाही, तर तो सामाजिक दृष्ट्याही महत्त्वाचा आहे. वर्षभरात निर्माण झालेली कटुता, वाद, मतभेद या दिवशी विसरून लोक नव्याने मैत्रीचा हात पुढे करतात. अनेक ठिकाणी समाजोपयोगी कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धा, नाटके आणि सामूहिक खेळांचे आयोजन केले जाते. त्यामुळे समाजात ऐक्य आणि सहकार्याची भावना निर्माण होते. तथापि, आधुनिक काळात होळी साजरी करताना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. रासायनिक रंगांमुळे त्वचेचे आणि डोळ्यांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे नैसर्गिक आणि सेंद्रिय रंगांचा वापर करणे योग्य ठरते. तसेच पाण्याची उधळपट्टी टाळून पर्यावरणपूरक पद्धतीने होळी साजरी करणे ही काळाची गरज आहे. मोठ्या आवाजातील डीजे, फटाके यामुळे ध्वनीप्रदूषण होते, त्यामुळे संयम बाळगणे आवश्यक आहे. सण साजरा करताना इतरांच्या भावना आणि सुरक्षिततेचा आदर राखणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. भारतातील विविध राज्यांमध्ये होळीचे वेगवेगळे रंग पाहायला मिळतात. मथुरा आणि वृंदावन येथे श्रीकृष्णाशी संबंधित पारंपरिक होळी प्रसिद्ध आहे. पंजाबमध्ये होला मोहल्ला साजरा केला जातो, तर पश्चिम बंगालमध्ये ङ्गदोल यात्राफ म्हणून हा सण ओळखला जातो. प्रत्येक ठिकाणी होळीची पद्धत वेगळी असली तरी आनंद आणि उत्साह समान असतो. शेवटी, होळी हा सण जीवनातील रंगांची आठवण करून देतो. जसे विविध रंग एकत्र येऊन सुंदर चित्र तयार करतात, तसेच विविध स्वभाव, विचार आणि संस्कृती असलेले लोक एकत्र येऊन समाजाची उभारणी करतात. होळी आपल्याला शिकवते की मनातील राग, द्वेष, मत्सर यांना जाळून टाकावे आणि प्रेम, मैत्री, आनंद यांचे रंग जीवनात भरावे. वसंत ऋतूच्या या आगमनाच्या उत्सवात प्रत्येकाने सकारात्मकता, उत्साह आणि सद्भावना यांचा स्वीकार करावा. अशा प्रकारे होळी हा सण भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग असून तो आनंद, एकता आणि मानवतेचा संदेश देणारा आहे. रंगांच्या या सणातून आपण सर्वांनी प्रेम, सहिष्णुता आणि पर्यावरणाची जपणूक यांचा संकल्प करून जीवन अधिक सुंदर आणि समृद्ध करावे.



दैनिक व्याघ्र शौर्यम

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रहीम शेख बाबू यांनी लोकशाही ऑफसेट एम–६९, एमआयडीसी जळगाव येथे छापून इस्लाम पुरा, जामनेर, जळगाव, महाराष्ट्र – ४२४२०६ येथे प्रसिद्ध केले. आर.एन.आय.नं. MHMAR/25/A2382

printed by the owner, printer, publisher, editor Sheikh Rahim Sheikh Babu at Lokshahi Offset M-69, MIDC Jalgaon and published at Islam Pura, Jamner, Jalgaon, Maharashtra - 424206. R.N.I. No. MHMAR/25/A2382

# विज्ञान दिनानिमित्त बायोकेमिस्ट्री विभागात प्रश्नमंजुषा

**जळगाव:** मुळजी जेठा महाविद्यालय येथील बायोकेमिस्ट्री (जैवरसायनशास्त्र) विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिन तसेच आंतरराष्ट्रीय प्रोटीन दिन यांच्या औचित्याने प्रश्नमंजुषा स्पर्धे सोबतच वैज्ञानिक सूचनांवर आधारित शोधमोहीम या आगळ्या वेगळ्या उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



या उपक्रमांचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, बायोकेमिस्ट्री विषयातील संकल्पना दृढ करणे तसेच प्रोटीनचे आरोग्य, पोषण आणि विविध जैविक प्रक्रियांमधील महत्त्वाबाबत जागरूकता निर्माण करणे हे होते. स्पर्धेमध्ये बी.एस्सी. बायोकेमिस्ट्रीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रश्नमंजुषा स्पर्धेत मूलभूत बायोकेमिस्ट्री, प्रोटीनची रचना व कार्य, पोषणशास्त्र, प्रयोगशाळा तंत्रज्ञान, विज्ञानातील महत्त्वपूर्ण शोध तसेच चालू घडामोडींशी संबंधित विविध फेऱ्यांचा समावेश करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत आपले विषयज्ञान, तर्कशक्ती आणि स्पर्धात्मक वृत्तीचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. यासोबतच आयोजित करण्यात आलेल्या वैज्ञानिक ट्रेझर हंट उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना प्रयोगशाळा व विज्ञानाशी संबंधित सूचनांवर आधारित विविध टप्पे पूर्ण करत अंतिम उद्दिष्ट गाठावे लागले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता, समस्या सोडविण्याची कौशल्ये, संघभावना आणि वैज्ञानिक विचारसरणी विकसित होण्यास मोठी मदत झाली. उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह निर्माण केला. स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे नियोजन बी.एस्सी. प्रथम वर्षातील विद्यार्थी राजेश प्रजापत, प्रथमेश पाटील, भुवनेश चौधरी, गौरी हलपतराव, अस्मिता तायडे आणि तृषा पाटील यांनी केले. कार्यक्रमाची अंमलबजावणी विभागप्रमुख डॉ. भूषण कविमंडन तसेच विभागातील प्राध्यापक डॉ. सुरेश कांबळे, डॉ. किशोर पाटील, डॉ. विपुल फालक फाळक आणि डॉ. उमेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त संवाद लेखकाशी उपक्रम

**जळगाव :** प्रतिकूल परिस्थिती आणि अभावग्रस्ततेमुळेच मला लेखनासाठी विषय सापडत गेले. ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसांचे अस्वस्थ करणारे जीवन वास्तव आणि उच्च शिक्षण घेतांना वेटर म्हणून काम करतांना आलेले अनुभव मला लिहिण्यासाठी बळ देणारे ठरले, अशी भावना टिश्यू पेपर या कादंबरीचे लेखक रमेश रावळकर यांनी व्यक्त केली.



मूळजी जेठा महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त संवाद लेखकाशी हा उपक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमात कादंबरीकार रमेश रावळकर आणि ज्येष्ठ लेखक रवींद्र पांढरे यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी मोकळेपणाने उत्तरे दिली. शालेय जीवनात मातीचे आणि शेतीचे अनुभव कवितेच्या माध्यमातून मांडायला सुरुवात केली. मात्र हळूहळू वेगवेगळ्या लेखकांचे साहित्य वाचत गेलो आणि काव्य लेखन फुलत गेले अशी भावना त्यांनी बोलून दाखवली. रमेश रावळकर म्हणाले, उच्च शिक्षण घेतांना हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम केले. यादरम्यान हॉटेल विश्वातील कामगारांचे भयावह जगणे अनुभवले. हे जगणे मराठी साहित्यात आलेले नाही हे जाणीव झाल्यानंतर आपण याविषयी लिहिले पाहिजे अशी भावना निर्माण झाली. आणि त्यातून टिश्यू पेपर ही कादंबरी आकाराला आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

ज्येष्ठ कादंबरीकार रवींद्र पांढरे यांनी आपल्या मुलाखतीत आपला लेखन प्रवास उलगडून दाखवला. कविता लेखनापासून सुरू झालेला प्रवास कथा आणि कादंबरी लेखनापर्यंत पोहोचला. माझ्या लेखनात माझ्या गाव-शिवारातील सर्वसामान्य माणसांचे जगणे मी चित्रित केलेले आहे. त्यासाठी माझ्या परिसरातील बोलीभाषेचा वापर करत हे अस्सल जीवन अनुभव मांडलेले आहेत असेही त्यांनी सांगितले.

डॉ.रमेश रावळकर आणि रवींद्र पांढरे यांची मुलाखत डॉ. योगेश महाले, ऐश्वर्या पाटील व योगेश पाटील यांनी घेतली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांनी दीपप्रज्वलन आणि कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यावेळी मू.जे. महाविद्यालयातील मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता भूपेंद्र केसूर उपस्थित होते.

## कृषी पुरस्कारांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जळगाव :** महाराष्ट्र हे कृषी उत्पादन व कृषी उद्योग क्षेत्रात देशातील अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यातील शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती व संस्थांचा सन्मान दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत विविध पुरस्कारांनी करण्यात येतो. हे पुरस्कार राज्यपाल, महाराष्ट्र यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतात.

या पुरस्कारांमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार यांचा समावेश आहे. यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव तयार करण्यासाठी येणारा खर्च, वेळ व प्रक्रियेतील विलंब यामुळे सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत स्वतंत्र ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणाली कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://krishi.maharashtra.gov.in येथे कृषी पुरस्कार या टॅबमध्ये उपलब्ध आहे. या संगणकीय प्रणालीद्वारे पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे.

# सिद्धिविनायक विद्यालयात स्कूल रिच आऊट कार्यक्रम

**जळगाव :** येथील जुन्या औद्योगिक वसाहत मधील सिद्धिविनायक विद्यालयात मुळजी जेठा महाविद्यालय भौतिकशास्त्र विभाग व मराठी विज्ञान परिषदेच्या वतीने विज्ञानाचा प्रचार प्रसार आणि विज्ञानामध्ये गोडी निर्माण होण्यासाठी आठवी, नववी आणि दहावीतील २२५ विद्यार्थ्यांना विविध उपलब्ध साहित्याचा आधार घेऊन प्रकाशाच्या गुणधर्मावर आधारित दाब, जडत्व, केंद्रगामी हवेचा भवरा, केंद्र उदगामी हवेचा भवरा, कसे निर्माण होतात याची प्रात्यक्षिक माहिती प्राध्यापक दिलीप भारंबे यांनी दिली.



मुळजी जेठा महाविद्यालयातील द्वितीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी पवनचक्की विद्युत निर्मिती, टू स्ट्रोक इंजिन, फोर स्ट्रोक इंजिन या विषयावर आधारित प्रयोग दाखवून विद्यार्थ्यांना विज्ञानाची आवड निर्माण होण्याच्या दृष्टीने माहिती सादर करुन प्रचार प्रसार केला.

प्रा. डॉ. विशाल भारुड यांनी मराठी विज्ञान परिषदेच्या व मुळजी जेठा महाविद्यालयाच्या वतीने विज्ञानाचा प्रचार प्रसार आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण करण्यासाठी व भविष्यात विज्ञान क्षेत्रातील करिअरच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. प्रेमजीत जाधव यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रयोगांमध्ये असलेल्या विज्ञानाच्या संकल्पना स्पष्ट केल्या, भविष्यात विज्ञान, भौतिकशास्त्र आणि गणित विषयात असणाऱ्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. संजय भारंबे सर आणि उपप्राचार्य प्रा. मनोजकुमार चोपडा यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी सिद्धिविनायक विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.पी खोडपे, प्रा. दिलीप भारंबे, प्रा.रवींद्रसिंग पाटील, प्रा.डॉ.विशाल भारुड, प्रा.डॉ. प्रेमजीत जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. प्रा.खेमराज पाटील यांनी केले.

# रावेर पोलिसांनी १२ तासात लावला चोरीचा छडा!

## मेंढपाळाच्या सोने-चांदीच्या दागिन्यांवर डल्ला



**रावेर :** परिसरात मेंढपाल खंडू भिका सरगर (रा. बऱ्हाणपूर) यांनी वत्सलाबाई रामदास पाटील (रा. नेहता) यांच्या शेतात मेंढ्या बसवलेल्या होत्या. नेहता शिवरात त्यांनी त्यांचा संसारपयोगी सामान, सोने चांदीचे दागिने हे बैलगाडीवर पेटीमध्ये सुरक्षित ठेवलेले होते परंतु कोणीतरी अज्ञात व्यक्तीने ते चोरुन नेल्याच्या तक्रारीवरुन रावेर पोलिस स्टेशनला गु.र.नं ८५/२०२६ भा. न्या. संहीता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी अवघ्या बारा तासात गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या.

या गुन्ह्यात रावेर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक यांनी अमंलदार यांना तात्काळ सुचना दिल्या नुसार तपासाला लागलीच सुरवात करण्यात आली होती. परंतु सदर घटनास्थळ हे शेतशिवार असल्याने तेथे तांत्रिक तपासाला अडचण येत होती त्यावेळेस सदर घटनास्थळी असलेले प्रत्यक्ष साक्षीदार यांचे कडे तपास करण्यात आल्यावरुन एक महीला सदर घटनास्थळी संशयीतरित्या फिरत होती असल्याची माहीती बिट अमंलदार यांना मिळाल्यावरुन सदर महीला कोण होती? हे समजुन येत नव्हते परंतु रावेर पोलिसांना अखेर सदर महीलेची ओळख पटविण्यात यश आले. तसेच सदर महिलेला अगोदर विचारपुस केली असता ती उडवाउडवीचे उत्तरे देत असल्याने तिला विश्वासात घेवून विचारपुस करण्यात आल्यावर सदर महिलेने गुन्ह्याची कबुली देवून तिच्याकडे असलेले चोरीचा मुद्देमाल पोलिसांना काढून दिला.

# प्रोस्पेक्टिव्ह रिसर्च स्कीम आवृत्तीचे प्रकाशन



**जळगाव :** केसीईच्या पीजी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने प्रोस्पेक्टिव्ह रिसर्च स्कीम या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्रमुख अध्यक्ष डॉ. व्ही.एस.झोपे, प्रमुख पाहुणे मु. जे .महाविद्यालयाचे जीव रसायन विभाग प्रमुख डॉ.भूषण कवीमंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.बी. महाजन, पी. आर. एस. समन्वयक प्रा. संदीप पाटील हे उपस्थित होते.

प्रोस्पेक्टिव्ह रिसर्च स्कीम या विज्ञान पदव्युत्तर विद्यार्थी लिखित पुस्तकाचे प्रकाशन डॉ. भूषण कवीमंडळ यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकात विविध विषयांवर आधारित शोध निबंध सादर करण्यात आले आहेत. या पुस्तकात शोध निबंध सादरकरणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे रोख पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक प्रा. संदीप पाटील यांनी तर सूत्रसंचालन प्रा.रूपाली खंबायत तर प्रा.शालिनी झोपे यांनी आभार मानले.

# नवीन रेशन कार्डधारकांना धान्य देण्याची मागणी

**कासोदा, ता. एरंडोल :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्या वतीने नवीन रेशन कार्ड धारकांना रेशन मिळावे या मागणीसाठी जळगाव जिल्हा पुरवठा अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात असे नमूद करण्यात आले की, एरंडोल तालुक्यातील रेशन कार्ड धारकांना शासनाने ठरवून दिलेल्या अटीप्रमाणे दरमहा रेशन वितरित करण्यात येते, मात्र नवीन रेशन कार्ड धारकांना कोणत्याही प्रकारचा कोठा लागू केलेला नसल्यामुळे रेशन मिळत नाही. काही रेशनकार्ड धारकांनी कुटुंब वेगवेगळे झाल्यानंतर, लग्न झाल्यानंतर रेशनकार्ड वेगळे केले आहेत. तर त्यांना नवीन रेशन कार्ड बनवून मिळते. परंतु यांवर रेशन मिळत नाही. काही रेशनकार्ड धारक हे अत्यंत गरीब असतात मोल मजुरी करून उदरनिर्वाह करणारे असतात मात्र रेशन कार्डवर त्यांना रेशन मिळत नाही नसल्यामुळे कुटुंबाची मोठी अडचण होते. शासनाच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजना जनतेच्या कल्याणाकारी असल्या तरी गतिमान प्रशासन म्हणून नावलौकिक असलेल्या शासन दरबारी रेशन नवीन कोठा व वाढीव कोठा मंजूर होत नसल्यामुळे नवीन रेशन धारक सदर योजनेच्या लाभ घेण्यापासून वंचित आहेत एरंडोल तालुक्यातील प्रत्येक स्वत धान्य दुकान वर सुसुत्रता यावी.नवीन रेशनकार्ड धारकांना रेशन मिळणे बाबत त्वरित संबंधितांना आदेश देण्यात यावेत असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे एरंडोल तालुकाध्यक्ष तथा उपविभागीय दक्षता व संनियंत्रण समिती सदस्य प्रवीण बाविस्कर, एरंडोल महिला आघाडी तालुकाध्यक्ष माया खैरनार उपस्थित होते.

# नूतन मराठा महाविद्यालयात दुर्बिणीतून चंद्र आणि ज्युपिटरचे दर्शन



**जळगाव :** विज्ञानाची आवड आणि खगोलशास्त्राबद्दलची जिज्ञासा वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने शहरातील नूतन मराठा महाविद्यालय आणि स्वर्गीय दादासाहेब देवराम खुशाल पाटील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या पूर्वसंध्येला भव्य आकाश निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना चंद्र आणि ज्युपिटरचे प्रत्यक्ष दुर्बिणीतून दर्शन घेण्याची दुर्मीळ संधी मिळाली.

महाविद्यालयाच्या प्रांगणात हा आकाश दर्शनाचा सोहळा रंगला. अत्याधुनिक टेलिस्कोपच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना आकाशातील विविध ग्रह, नक्षत्रे आणि ताऱ्यांचे बारकाईने निरीक्षण करता आले. विशेषतः चंद्राच्या पृष्ठभागावरील विवरे आणि ज्युपिटरच्या तेजस्वी उपस्थितीने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली. अनेक विद्यार्थ्यांनी प्रथमच इतक्या जवळून खगोलीय दृश्य अनुभवले. या कार्यक्रमासाठी मुंबई येथील होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र चे निवृत्त वैज्ञानिक अधिकारी आनंद घ्यायचास प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी खगोलशास्त्रातील गुंतागुंतीच्या संकल्पना अतिशय सोप्या आणि रंजक भाषेत स्पष्ट केल्या. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी संयमाने उत्तरे देत विज्ञानातील कुतूहल अधिकच प्रज्वलित केले.

जळगावचे खगोल अभ्यासक अमोघ जोशी यांनीही आकाशातील घडामोडी, ग्रहांची हालचाल, तारकासमूहांची रचना आणि निरीक्षणाच्या तांत्रिक बाबींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या निमित्ताने विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या वैज्ञानिकांशी संवाद साधण्याची आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी लाभली.

कार्यक्रमाला फाउंडेशनचे उपाध्यक्ष साहेबराव पाटील, सायन्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. आर. बी. देशमुख, उपप्राचार्य डॉ. के. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. माधुरी पाटील यांच्यासह प्राचार्यवृंद, शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


# हिंगोणा गावात रक्तरंजित थरार!

## आरोग्य केंद्रासमोर युवकाचा मृत्यू : तिघे जखमी

**यावल ।** तालुक्यातील हिंगोणा गावात शनिवारी सकाळी शांततेला काळी छाया लागली. प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरच घडलेल्या चाकू हल्ल्याने संपूर्ण परिसर हादरून गेला. सकाळी सुमारे आठ वाजताच्या सुमारास झालेल्या या घटनेत प्रथमेश मुकेश महाले (वय २२) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तिघेजण जखमी झाले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, गौरव जीवन जाधव याने प्रथमेश महाले यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा आरोप आहे. हल्ला अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याने प्रथमेश यांची प्रकृती चिंताजनक बनली. त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली.

सावदा येथील डॉ. सचिन पाटील यांनी तपासणी करून प्रथमेश यांना मृत घोषित केले. दरम्यान, वाद सोडवण्यासाठी पुढे सरसावलेल्या रीना रोहित गजरे, मोहित राजेंद्र गजरे आणि निखिल राजेंद्र गजरे हे तिघेही जखमी झाले असून त्यांच्यावर जळगाव येथील रुग्णालयात उपचार



सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच फैजपूर पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक रामेश्वर मोताळे व त्यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत गावात शांतता राखण्याचे आव्हान केले असून . परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. आरोपीचा शोध सुरू असून नेमक्या कारणाचा तपास पोलीस करीत आहेत.

दिवसा ढवळ्या, तेही प्राथमिक आरोग्य केंद्रासमोर घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. गावात एकच खळबळ उडाली असून पुढील तपासानंतरच या घटनेमागील कारण स्पष्ट होणार आहे.

# जामनेर उर्दू शाळेत विज्ञान प्रदर्शन उत्साहात





**जामनेर :** शहरातील प्रसिद्ध ज़िकरा एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू उर्दू प्राथमिक शाळा येथे विज्ञान दिवसा निमित्ताने विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध वैज्ञानिक प्रकल्प सादर केले.

या प्रदर्शनामध्ये जलसंवर्धन, सौरऊर्जा, पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक व माहितीपूर्ण मॉडेल्स तयार करून सादर केली. विद्यार्थ्यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक व विद्यार्थ्या समोर आपल्या प्रकल्पांची माहिती आत्मविश्वासाने दिली. कार्यक्रमाचे उद्घाटन जिकरा एज्युकेशन सोसायटीचे सचिव जाकीर शेख यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन व सर्जनशीलता विकसित होते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी उत्कृष्ट प्रकल्प सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विज्ञान शिक्षक सईद, तबस्सूम मॅडम सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.




# एस.टी.बस-इको वाहन अपघातात १० विद्यार्थी जखमी

**यावल :** यावलकडून बोरावल गावाकडे जाणाऱ्या एसटी बसने शालेय विद्यार्थ्यांची अवैध वाहतूक करणाऱ्या ईको या वाहनाला जोरदार धडक दिल्याने मोठा अपघात घडला. या अपघातात इको वाहन चालकासह सुमारे १० ते १२ विद्यार्थी जखमी झाले तर २ विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची चर्चा आहे.

या अपघातामुळे शालेय विद्यार्थ्यांची सर्रासपणे सुरू असलेल्या अवैध वाहतूक बाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. एस.टीचे वाहक एस.एम.पाटील, चालक ए.ए.तडवी हे होते. घटनेनंतर परिसरात शैक्षणिक क्षेत्रात आणि संबंधित पालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आणि सर्वांनी यावल ग्रामीण रुग्णालयात लहान लहान बालकांना पाहण्यासाठी गर्दी केली

सकाळी साडेसातच्या सुमारास एमएच ४० एन ९८४५ क्रमांकाची यावल-टाकरखेडा मार्गावरील एसटी बस भालशिव पिंप्री फाट्यावरून जात असताना, भालशिव पिंप्रीकडून यावलच्या एका खासगी शाळेकडे विद्यार्थी घेऊन जाणारी एमएच ३७ जी ६६८० क्रमांकाची ईकोकार समोर आली. यावेळी दोन्ही वाहनांची जोरदार धडक झाली. धडक जोरदार लागल्याने ईको कारमधील चालक व विद्यार्थी जखमी झाले. जखमींना तातडीने यावल ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. बोरावल परिसरातील तसेच यावल शहरातील नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. जखमी विद्यार्थ्यांवर यावल ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांनी तातडीने प्रथमोपचार केले. तर गंभीर जखमी विद्यार्थ्यांना पुढील उपचारासाठी एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.यात दोन विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघातातील विद्यार्थी वाहतूक करणारी ईकी कार पोलिसांनी ताब्यात घेतली आहे.

# जेसीआय जळगाव सेंट्रल तर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांना दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे किट

**जळगाव :** जेसीआय जळगाव सेंट्रल तर्फे मबदलाव ड्राईव्हफ अंतर्गत शासकीय संयुक्त बहुविकलांग केंद्र, सिंधी कॉलनी, जळगाव येथे दिव्यांग विद्यार्थ्यांना दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे किट, वैद्यकीय किट तसेच खेळ साहित्य वितरित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकताना दिसला.

कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित सदस्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्यासोबत काही क्षण घालवले. उपक्रम साधेपणाने




व सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पार पडला. या प्रसंगी जेसीआयच्या अध्यक्षा ॲड. अंजली गादीया, खजिनदार सीए मोनिका ओस्तवाल, कार्यकारी संचालक जेसी सीए अक्षय गादीया, श्रेयांस ओस्तवाल, विश्वेश मणियार, सीए विनय बाफना, सीए खुशबू बाफना, अनामिका शर्मा, खुशबू माधवानी, हर्षल कटारिया, मीताली कटारिया, सीए वेणुगोपाल झवर, मोहित माधवानी, सीए दिव्या झवर, कुशल बापेचा, सीए वेणु गोपाल बिर्ला, उपस्थित होते.

# गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात

**जळगाव :** दरवर्षी २८ फेब्रुवारी रोजी डॉ. सी. व्ही. रमण यांनी शोधलेल्या ङ्करमण परिणामम स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे हा या दिवसाचा उद्देश आहे. यावर्षाची संकल्पना - महिलांचा विज्ञानातील सहभाग : विकसित भारतासाठी प्रेरक शक्ती. असे आहे.

गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात माननीय प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील,



सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करणारी भाषणे दिली. मार्गेश वाघ, यश धनगर, भैरवी कुरकुरे, राजश्री यादव, रिद्धी भिरूड, गौरव इंगळे आणि माहिन शेख यांनी आपले विचार मांडले.

प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना नवोपक्रम करण्याचे आवाहन केले. त्यांनी यावर्षीच्या विषयाचा संदर्भ देत महिलांच्या विज्ञानातील योगदानाचे महत्त्व सांगितले. कोविड काळातील लसीचा शोध हा शतकातील महत्त्वाचा वैज्ञानिक शोध असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यातील अन्नटंचाईसारख्या आव्हानांवर वैज्ञानिक दृष्टिकोनातून उपाय शोधण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्ष -IDS शाखेतील आदेश जैस्वाल या विद्यार्थ्याने केले. कार्यक्रमाचे समन्वयक ग्रंथपाल प्रा. नाकुल गाडगे यांनी केले. सर्व विभागांतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला. सदरील कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील सर, डॉ.वर्षा पाटील मॅडम (सचिव), डॉ. केतकी पाटील मॅडम (सदस्य), डॉ. वैभव पाटील सर (डीएम कार्डिओलॉजिस्ट) व डॉ. अनिकेत पाटील सर यांनी कौतुक केले.

# यश करिअर अकॅडमीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त तालुकास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा; १६७ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**यावल ।** यावल शहरात यश करिअर अकॅडमीतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६व्या जयंतीनिमित्त तालुकास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे १४ फेब्रुवारीला आयोजन केले होते. या परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर करुन गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कुंदन फेगडे, प्रा. मुकेश येवले, उपप्राचार्य डॉ. एच. जी. भंगाळे, डॉ. आर. डी. पवार, प्रा. पी. एस. सोनवणे, प्रा. लव्हली विनसेट मथायस, प्रा. अजय पाटील, सागर देवांग यांची उपस्थिती होती. दोन गटात घेतलेल्या या सामान्यज्ञान स्पर्धेत १६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पहिला गट पाचवी ते आठवी, दुसरा गट नववी ते बारावीचा होता. पहिल्या गटात निशांत दिनकर बाविस्कर (प्रथम), सान्वी पंकज गडे (द्वितीय), देवश्री बंडू चौधरी (तृतीय) तर दुसऱ्या गटात उत्कर्षा सुनील पाटील (प्रथम), तेजल खिलचंद पाटील (द्वितीय), मनीष अशोक पाटील (तृतीय) यांनी तर दोन्ही गटात २ उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी व रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रसंगी डॉ. कुंदन फेगडे यांनी स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी लहान वयातच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करायला हवा, तर पालकांनीही महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे, असे आवाहन केले. तर यश करिअर अकॅडमीचे संचालक प्रा. समाधान भोई यांनी ही संधी उपलब्ध करून दिली असून त्याचा लाभशहरवासीयांनी घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले. सूत्रसंचालन डॉ. संतोष जाधव यांनी, तर प्रा. संतोष वानखेडे यांनी आभार मानले. याप्रसंगी अकॅडमीचे सदस्य रमेश भोई, संगीता भोई, तेजस्विनी भोई, प्रा. सुनील पाटील, प्रा. सुहास भालेराव, प्रा. अर्जुन गाढे, प्रा. दानिश पटेल, प्रा. हेमंत पाटील, सर्व विद्यार्थी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# हसनैन साजीद खानचा सातव्या वर्षी नवा संकल्प!



**खिर्डी, ता. रावेर ।** धार्मिक संस्कार आणि संयमाची प्रचिती देत खिर्डी येथील हसनैन साजीद खान या ७ वर्षीय चिमुकल्याने आपला आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीरित्या पूर्ण केला. कडक ऊन आणि प्रदीर्घ उपवास असूनही हसनैनने दाखवलेल्या या चिकाटीचे संपूर्ण गावातून विशेष कौतुक होत आहे. हसनैन हा साजीद खान यांचा सुपुत्र असून त्याला या उपवासासाठी खान परिवाराचे मोठे प्रोत्साहन लाभले. पहाटेच्या सहरीपासून ते सायंकाळच्या इफ्तारपर्यंत त्याने न डगमगता हा रोजा पूर्ण केला. हसनैनने इतक्या लहान वयात दाखवलेली ही जिद्द पाहून त्याचे वडील साजीद खान यांच्यासह त्याचे काका जाकीर खान, जाविद खान, रिजवान खान आणि सद्दाम खान यांनी त्याचे मनापासून कौतुक करत त्याला आशीर्वाद दिले. हसनैनने पहिला रोजा पूर्ण केल्याच्या निमित्ताने खान परिवारात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण आहे. लहान वयातच मुलांमध्ये शिस्त आणि भक्तीची आवड निर्माण व्हावी, हा उद्देश हसनैनने आपल्या कृतीतून सार्थ ठरवला अशा भावना त्याच्या काकांनी व्यक्त केल्या.

# प्रगती शाळेत विज्ञान दिनानिमित्त साहित्याचे प्रदर्शन

**जळगाव :** विद्यावर्धिनी शिक्षण संस्था संचलित प्रगती शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान विषयांवरील आकर्षक व कल्पक मॉडेल साहित्याचे प्रदर्शन आयोजित केले होते.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, सौरऊर्जा, जलसंवर्धन, पवनऊर्जा, अवकाश संशोधन इत्यादी विषयांवर सुंदर व माहितीपूर्ण मॉडेल सादर केली.

विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेचे चेअरमन प्रेमचंद ओसवाल, अध्यक्षा मंगला दुनाखे व सचिव सचिन दुनाखे यांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या माध्यमातून नवनवीन शोध घेण्याची प्रेरणा दिली. प्रास्ताविक विज्ञान शिक्षक मनोज भालेराव यांनी केले. त्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना प्रयोगशील वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. भाग्यश्री तळेले यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले सूत्रसंचालन विजया पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन सोनल चौधरी यांनी मानले.



# पाचोरा नगर परिषदेचे अंदाजपत्रक मंजूर

**पाचोरा ।** येथील नगर परिषदेचा सन २०२६- २७चे करवाढ नसलेले अंदाजपत्रक २७फेब्रुवारीला झालेल्या विशेष सभेत मंजूर करण्यात आले. एकूण २१० कोटी ३२ लाखांचे शिलकी अंदाजपत्रक सभेसमोर सादर केले असून त्यास सभेची मंजुरी मिळाली आहे. या अंदाजपत्रकात सुमारे ८ लाखांची शिलकी तरतूद दाखवण्यात आली आहे.

सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सुनीता पाटील होत्या. मुख्याधिकारी मंगेश देवरे यांच्या मार्गदर्शनात लेखाधिकारी अमोल कुमावत यांनी अंदाजपत्रकाचे सादरीकरण केले. या वेळी उपनगराध्यक्ष किशोर बारवकर, शिवसेनेचे गटनेते सुमीत पाटील, भाजपचे गटनेते सूरज वाघ, बांधकाम सभापती प्रियंका पाटील, आरोग्य सभापती सतीश चेडे, शिक्षण सभापती प्रवीण ब्राह्मणे, पाणी पुरवठा सभापती रेहमान तडवी, मीनाक्षी एरंडे तसेच सर्व नगरसेवक आणि अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान, या अर्थसंकल्पात तरतुदींवरील अपेक्षित खर्चाचा विचार करून तसेच पालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी अनावश्यक खर्चावर नियंत्रण, काटकसर आणि आर्थिक शिस्तीवर भर देण्यात आला आहे. तसेच पालिका स्वयंपूर्ण होण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्याचा निर्धार या वेळी व्यक्त करण्यात आला.

पाचोरा शहराच्या विकासाच्या दृष्टीने अनेक प्रमुख योजना आगामी आर्थिक वर्षात राबवण्यात येणार आहेत. यात महाराष्ट्रस्तरीय नगरोत्थान महाअभियान योजना (रस्ते प्रकल्प), महाराष्ट्रस्तरीय नगरोत्थान महाअभियान योजना (भुयार गटार), अमृत २.० प्रकल्प, तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी कोणतीही करवाढ सुचवण्यात आलेली नाही.

# नशिराबाद नगरपरिषदेचा १५०.७८ कोटींचा भांडवली शिलकी अर्थसंकल्प सादर

**नशिराबाद :** नशिराबाद नगर परिषदेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा १५० कोटी ७८ लाख ५० हजार रुपयांचा भांडवली शिलकी अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आला. मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे यांनी हा अर्थसंकल्प सभागृहासमोर मांडला.

सभेला नगराध्यक्ष योगेश पाटील, उपनगराध्यक्ष तथा शिक्षण, पर्यावरण व आपत्ती व्यवस्थापन सभापती पंकज महाजन, अर्थ व नियोजन सभापती मनोज पाटील, महिला व बालकल्याण सभापती मन्यार कमरुनिसा सय्यद बिस्मिल्ला, उपसभापती भारताबाई धनगर, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता व दिवाबत्ती सभापती चेतन बऱ्हाटे तसेच नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

या अर्थसंकल्पात शहराच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात आले असून पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे. पाणी पुरवठा योजना, गटार योजना आणि नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. शहरातील मूलभूत सुविधा सक्षम करण्याच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.



सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन नगर परिषद हद्दीतील मृत व्यक्ती तसेच बेवारस प्रेतांच्या अंत्यविधी व दफनविधीचा संपूर्ण खर्च नगर परिषदेच्या वतीने करण्यात येणार आहे. यासाठी स्वतंत्र विशेष तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्प तयार करताना लेखापाल दौलत गुट्टे, लेखापरीक्षक मनोज गोरे, कार्यालय अधीक्षक आझाद पटेल तसेच संतोष रगडे उपस्थित होते.

# वासुदेव जेष्ठ नागरिक संघाचे सवलतीत तीर्थाटन

**भुसावळ ।** ज्येष्ठ नागरिकांना धार्मिक पर्यटनाची संधी स्वस्त आणि सुरक्षित दरात उपलब्ध करून देणाऱ्या राज्य शासनाच्या योजनेचा लाभ घेत भुसावळ शहरातील वासुदेव जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य शेगाव येथे श्री गजानन महाराजांच्या दर्शनासाठी रवाना झाले. ङ्गहिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे – एसटी संगे तीर्थाटन योजनाफ अंतर्गत ही सहल आयोजित करण्यात आली असून शहरातील ज्येष्ठ नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.



भुसावळ येथील ओम सिद्धगुरु नित्यानंद प्रतिष्ठान संचलित वासुदेव जेष्ठ नागरिक संघाचे सुमारे ४४ सभासद आज सकाळी शेगाव येथे गजानन महाराज यांच्या दर्शनासाठी रवाना झाले. बस रवाना करताना गण गण गणात बोतेच्या जयघोषात वातावरण भक्तिमय झाले होते. प्रभाकर झांबरे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून एसटी बसला शुभारंभ करण्यात आला. यावेळी वाहन चालक एन. एस. कोळी, संघाचे संयोजक डॉ. नितू पाटील तसेच इतर सर्व सभासद उपस्थित होते.

या प्रसंगी संजय सावकारे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सुरू केलेली ङ्गमहाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे एसटी संगे तीर्थाटन सेवाफ ही योजना ज्येष्ठ नागरिकांसाठी अत्यंत लाभदायक ठरत आहे. ४० प्रवाशांचा गट तयार झाल्यास महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना मूळ तिकिटावर ५० टक्के सवलत दिली जाते, तर ७५ वर्षांवरील नागरिकांना विनामूल्य प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आगारनिहाय बसेस आरक्षित करून सुरक्षित प्रवासाची हमी दिली जाते, असेही त्यांनी नमूद केले.

स्वस्त आणि सुरक्षित या ब्रीदवाक्यावर आधारित या योजनेचा मुख्य उद्देश सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात धार्मिक पर्यटनाची अनुभूती देणे हा आहे. ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक समाधान मिळावे, यासाठी अशा सहली उपयुक्त ठरतात. संघाचे संयोजक डॉ. नितू पाटील हे अभ्यासू आणि चिकित्सक वृत्तीचे असून ते ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम सातत्याने राबवत असतात, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# कोरपावली येथे बोगस डॉक्टरवर कारवाई

**यावल ।** ग्रामीण भागात आरोग्य सुविधांची कमतरता असताना यावल तालुक्यात बोगस डॉक्टरांचा व्यवसाय तेजीत सुरू असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. चुकीचे निदान आणि अपुरे वैद्यकीय ज्ञान यामुळे सर्वसामान्य रुग्णांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण होत असून आरोग्य यंत्रणेने कारवाईचा बडगा उगारला आहे.

यावल तालुका अंतर्गत कोरपावलीसह विविध ठिकाणी ङ्गझोला छापफ मुन्नाभाई एमबीबीएस म्हणून ओळखले जाणारे बोगस डॉक्टर अनेक दिवसांपासून सर्रासपणे वैद्यकीय सेवा देत असल्याची माहिती समोर आली आहे. विशेषतः कोरपावली येथे एका बंगाली बोगस डॉक्टराने ठाण मांडून उपचार सुरू ठेवले होते. यापूर्वीही त्याच्याविरोधात तक्रारी समोर आल्या होत्या; मात्र ठोस कारवाईअभावी त्याचा व्यवसाय सुरूच असल्याची चर्चा होती.

तक्रारींची दखल घेत सावखेडा सिम प्राथमिक आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्वला भंगाळे यांनी तालुका आरोग्य अधिकारी राजू तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली. प्राथमिक आरोग्य केंद्र सावखेडा सिम अंतर्गत उपकेंद्र मोहराळा हद्दीतील कोरपावली येथे जाऊन संबंधित बोगस डॉक्टरावर नोटीस बजावण्यात आली. या कारवाईदरम्यान आरोग्य सेवक चेतन कुरकुरे, इम्रान पटेल, हनीफ तडवी तसेच आशा सेविका उपस्थित होत्या.

आरोग्य विभागाकडून देण्यात आलेल्या नोटीसमध्ये संबंधित व्यक्तीस तत्काळ बोगस वैद्यकीय व्यवसाय बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यापूर्वीही त्याच्यावर कारवाई करण्यात आल्याचे नमूद करून, पुढे पुन्हा बोगसपणे उपचार करताना आढळल्यास कठोर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. आरोग्य सेवक चेतन कुरकुरे यांच्या उपस्थितीत ही नोटीस देण्यात आली.

# वासुदेव जेष्ठ नागरिक संघाचे सवलतीत तीर्थाटन

**जळगाव–** ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली जळगावात विशेष मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत २० रुग्णांवर मोफत आणि यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, ग्रामीण नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जळगाव येथे ङ्गगिरीश महाजन वैद्यकीय सहायता कक्षफ यांच्या पुढाकाराने विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात प्रामुख्याने जामनेर तालुका परिसरातील गरजू रुग्णांचा समावेश होता. पहूर, पाळधी आणि लोंढरी या गावांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

ग्रामीण भागात डोळ्यांच्या आजारांकडे दुर्लक्ष होण्याची समस्या मोठ्या प्रमाणात आढळते. यामुळे अनेकांना दृष्टीदोषाचा त्रास सहन करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊनच या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात सर्व रुग्णांची प्राथमिक तपासणी करून त्यानंतर आवश्यक त्या रुग्णांवर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली.

या शस्त्रक्रिया शासकीय रुग्णालयातील अनुभवी नेत्रशल्यचिकित्सकांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडल्या. पथकात डॉ. प्रविण पाटील, डॉ. मयुरी राठोड, डॉ. राधीका दरक, डॉ. मयुरेश डोंगरे, डॉ. सोबीया अन्सारी, डॉ. स्वाती आसोले आणि डॉ. प्रियंका पाटील यांचा समावेश होता. तसेच नेत्रचिकित्सा अधिकारी विलास बाविस्कर, भारती वाणी, आरव आराक आणि गौरव चौधरी यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. सहाय्यक कर्मचारी सुनिता वक्ते, भाग्यश्री ढाकणे, वैष्णवी दांडगे आणि हीरा पालवी यांनी शस्त्रक्रियेदरम्यान तसेच नंतरच्या देखभालीत मोलाचे सहकार्य केले.

# राहत्या घरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

**अमळनेर ।** अमळनेर तालुक्यातील टाकरखेडा परिसरातून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने फुस लावून अपहरण केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शनिवारी २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमळनेर तालुक्यातील टाकरखेडा गावातील एका भगात राहणाऱ्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने काहीतरी आमिष दाखवून तिचे अपहरण केल्याची घटना शनीवारी २८ फेब्रुवारी रोजी घडली आहे. पिडीत मुलीच्या नातेवाईकांनी तिचा सर्वत्र शोध घेतला परंतू कोणतीही माहिती मिळाली नाही. अखेर तिच्या आजोबांनी अमळनेर पोलीस ठाण्यात धाव घेवून तक्रार दिली. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पी. व्ही. सिंधूने सांगितला दुबई विमानतळावरील थरारक अनुभव

**दुबई ।** मध्य पूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर दुबई विमानतळावर अडकलेल्या भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिने अवघ्या १०० मीटर अंतरावर झालेल्या स्फोटाचा थरारक अनुभव सोशल मीडियावर शेअर केला आहे. ङ्गऑल इंग्लंडफ स्पर्धेसाठी यूकेकडे रवाना झालेल्या सिंधूच्या प्रवासात अचानक घडलेल्या या घटनेमुळे काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



अण्वस्त्रनिर्मिती रोखण्यासाठी कराराच्या चर्चेच्या तीन फेऱ्या निष्फळ ठरल्यानंतर अमेरिका आणि इस्रायल यांनी शनिवारी इराणवर जोरदार हल्ले चढविल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यांमध्ये २०० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त असून, प्रत्युत्तरादाखल इराणने इस्रायलसह आठ देशांवर प्रतिहल्ले केले आहेत. अनेक ठिकाणी हल्ले सुरूच असल्याने मध्य पूर्वेतील तणाव अधिकच वाढला आहे. या पार्श्वभूमीवर हवाई क्षेत्र बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने अनेक प्रवासी विविध विमानतळांवर अडकले.

पी. व्ही. सिंधू बेंगळुरूहून ऑल इंग्लंड चॅम्पियनशिपफमध्ये सहभागी होण्यासाठी यूकेमधील बर्मिंगहॅम येथे जात होती. तिचे विमान दुबईत उतरले असताना अचानक परिस्थिती बिघडली. काही तासांतच हवाई क्षेत्र बंद करण्यात आले आणि विमानसेवा विस्कळीत झाली. गेल्या काही तासांपासून प्रचंड तणाव होता. विमानांचे आवाज सतत ऐकू येत होते. आम्ही जिथे अडकलो होतो, त्या ठिकाणापासून अगदी जवळ स्फोट झाला, असे सिंधूने व्हिडिओत सांगितले.

तिने पुढे सांगितले की, तिचे प्रशिक्षक त्या स्फोटाच्या ठिकाणापासून अवघ्या १०० मीटर अंतरावर होते. स्फोट होताच त्यांना तत्काळ सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. इतक्या जवळ अशी घटना अनुभवणे हादरवून टाकणारे होते. आपल्या किंवा आपल्या जवळच्या व्यक्तींशी असे काही घडेल, अशी अपेक्षा कधीच नसते. पण काही वेळा परिस्थिती आपल्या नियंत्रणाबाहेर असते, असे ती म्हणाली. या संकटाच्या क्षणी तिच्या टीमने दाखविलेला संयम आणि एकजूट हीच खरी ताकद असल्याचेही तिने नमूद केले.

सिंधूने सांगितले की, सध्या ती आणि तिची टीम सुरक्षित ठिकाणी असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. दुबईतील भारतीय उच्चायुक्तालयाने तात्काळ संपर्क साधून आवश्यक मदत पुरवली.

दैनिक व्याघ्र शौर्यम
Smart City
जळगाव ▪ सोमवार, दि.०२ मार्च २०२६
epaper.vyaghrashuryam.com


## विद्यापीठात राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र व कला व मानव्यविद्या प्रशाळेच्या भारतीय ज्ञान परंपरा केंद्रातर्फे इंडियन नॉलेज सिस्टीम अँड इट्स ग्लोबल इम्पॅक्ट या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद दि. ४ व ५ मार्च रोजी विद्यापीठाच्या पर्यावरण प्रशाळेच्या सभागृहात पार पडणार आहे. परिषदेचे उद्घाटन दि. ४ मार्च रोजी सकाळी १० वाजता होणार असून भारतीय ज्ञान परंपरेचे अभ्यासक आचार्य श्रेयस कुडेकर हे बीजभाषण करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्रा. प्रकाश पाठक, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांची उपस्थिती लाभणार आहे.

# उत्तर महाराष्ट्र- मराठवाडा खान्देश एक्स्प्रेस महामार्ग!

### १०५ किमी लांब मार्गाने थेट समृद्धीला जोडणार : प्रवास सुखकर होणार

**जळगाव ।**
जिल्ह्याच्या विकासाला गती देणारा व उत्तर महाराष्ट्र - मराठवाड्याला जोडणारा जळगाव ते छत्रपती संभाजीनगर हा महामार्ग आता सहापदरी खान्देश एक्सप्रेस म्हणून ओळखला जाणार आहे. विशेष म्हणजे हा मार्ग थेट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाफ्ला जोडला जाणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषदेच्या कामकाजादरम्यान आमदार एकनाथ खडसे यांनी जळगाव जिल्ह्याच्या प्रलंबित प्रश्नांवरून सरकारवर प्रश्नांची सरबत्ती केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जळगाव दौऱ्यात या



महामार्गाबाबत आश्वासन दिले होते, याची आठवण करून देत खडसे म्हणाले, घोषणा होऊन बराच काळ लोटला, पण प्रत्यक्ष कामाला सुरुवात कधी होणार? हा मार्ग केवळ कागदावरच राहणार का? असा थेट सवाल उपस्थित केला. या महामार्गामुळे जळगावच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यावर जळगावची केळी थेट समृद्धी महामार्गावरून मुंबई आणि नागपूरच्या मोठ्या बाजारपेठांमध्ये अत्यंत कमी वेळेत पोहोचू शकेल. या महामार्गामुळे जळगाव आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील व्यापार आणि उद्योगाला मोठी चालना मिळणार आहे. या महामार्गामुळे जळगाव ते छत्रपती संभाजीनगर हे अंतर केवळ वेळेच्या दृष्टीनेच कमी होणार नाही, तर उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडा यांच्यातील दळणवळणाचे एक नवे पर्व सुरू होईल. खडसे यांच्या पाठपुराव्यामुळे सरकारने दिलेल्या या उत्तराने जळगाव जिल्ह्यात समाधान व्यक्त होत असून, आता सर्वांचे लक्ष या मार्गाच्या भूमीपूजनाकडे लागले आहे.

**खान्देश एक्स्प्रेस प्रकल्प**

सरकारच्या वतीने उत्तर देताना राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. हा मार्ग थेट समृद्धी महामार्गाला जोडला जाईल. ज्यामुळे मुंबई आणि नागपूरकडे जाणारी वाहतूक वेगवान होईल. प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, त्यानंतर तांत्रिक मान्यतेसह प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, असे त्यांनी सांगितले.

## लोकशाही दिनासाठी ऑनलाईन अर्ज

**जळगाव** ✍ प्रतिनिधी

जिल्ह्यातील नागरिक व शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. नागरिकांचा वेळ, प्रवास खर्च व श्रम वाचविण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने लोकशाही दिनासाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ व सुटसुटीत केली आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज करण्यासाठी नागरिकांना प्रत्यक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. नागरिकांनी आता आपले अर्ज जिल्हाधिकारी जळगाव यांच्या अधिकृत संकेतस्थळावर Jalgaon.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने दाखल करावेत, अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लोकशाही दिनासाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी प्रक्रिया दर महिन्याच्या १ ते १५ तारखेपर्यंत ऑनलाईन सुरू राहणार आहे. या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांवर संबंधित विभागाकडून कार्यवाही करून अर्जदारास लेखी कळविण्यात येणार आहे. दि. २ मार्च रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या लोकशाही दिनासाठी १ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत ऑनलाईन अर्ज दाखल केलेल्या नागरिकांनीच उपस्थित राहावे.

## मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना प्रशिक्षण

**जळगाव** ✍ प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतमालाची ने-आण सुलभ व्हावी तसेच कापणी, मळणी, आंतरमशागत आदी शेतीकामे सुलभपणे पार पडावीत यासाठी शेतरस्त्यांचे मजबुतीकरण आवश्यक असल्याने ङ्गमुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनाफ सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षणात शासन निर्णयातील विविध तरतुदींचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख विभाग, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग,




कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना; कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, तहसीलदार, गटविकास अधिकारी व पंचायत समितीचे लेखा अधिकारी उपस्थित होते.

यावेळी अपर जिल्हाधिकारी डॉ. श्रीमंत हारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे तसेच उपजिल्हाधिकारी (रोहयो) मंजुषा घाटगे उपस्थित होत्या. हे प्रशिक्षण उपविभागीय अधिकारी फैजपूर बबन काकडे यांनी दिले. शासन निर्णय दि. १४ डिसेंबर २०२५ मधील तरतुदींचे काटेकोर पालन करून ङ्गमुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनाफ प्रभावीपणे राबवावी व योजना यशस्वी करावी, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना केले. तसेच यासंदर्भातील तांत्रिक प्रशिक्षण लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी श्रीमती घाटगे यांनी दिली.

# मित्रानेच मित्राला मध्यरात्री संपवले!

### क्षुल्लक कारणावरुन दोघांमध्ये वाद : शव बघून आई-वडिलांना अश्रू अनावर

**जळगाव** ✍ प्रतिनिधी

भुसावळ शहरात मध्यरात्री एक वाजेच्या सुमारास दोन मित्रांमध्ये शाब्दिक वाद झाला या वादाचे रूपांतर थेट हत्येत झाले. मित्रानेच मित्राच्या डोक्यात सिमेंटची कुंडी घालून मित्राला ठार केल्याची मोठी घटना भुसावळ शहरात घडली आहे. शहरातील आनंदनगर-नेब कॉलनी परिसरात शनिवारी मध्यरात्री झालेला शाब्दिक वादातून मित्रानेच मित्राची



हत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अनिल उर्फ पिंटू आत्माराम सावकारे (वय ४२) रा. आनंदनगर नेब कॉलनी असं मृत व्यक्तीचे नाव असून किरकोळ वादातून ही घटना घडली असल्याची माहिती समोर येत आहे. हत्या झालेल्या व्यक्ती आणि संशयित हे दोन्ही मित्र असल्याची माहिती देखील आहे.

शनिवारी मध्यरात्री साधारण एक वाजेच्या सुमारास सावकारे यांचे त्याच परिसरातील एका तरुणाशी वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्यावर झाडे लावण्याची सिमेंटची कुंडी अनिल सावकारे यांच्या डोक्यावर मारण्यात आल्याने यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र घटनास्थळी त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारबोले, बाजारपेठ ट्रान्सपोर्ट निरीक्षक राहुल वाघ आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून संबंधित पुरावे जप्त केले असून घटनेच्या संदर्भात रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदवण्याचे काम सुरू होते. दरम्यान, या भयंकर घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी तरुणाच्या नातेवाईकांनी केली आहे.

cmyk